अतारांकित प्रश्नोत्तरांची १०१ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

शिर्डी (जि. अहमदनगर) येथील साई संस्थानच्या दोन्ही रुग्णालयातील औषध खरेदीतील गैरव्यवहाराबाबत

(१) २७१७२ (२२-०३-२०२१). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि. अहमदनगर) येथील साई संस्थानच्या दोन्ही रुग्णालयात दाखल होणाऱ्या गरीब व अत्यल्प उत्पन्न गटातील लाभार्थी रुग्णांना बाहेरील खाजगी दुकानांमधुन महागडी औषधे खरेदी करावी लागत असल्याची बाब माहिती अधिकाराच्या माध्यमातुन निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत पाच वर्षात रुग्णालयांकरिता साई संस्थान मार्फत रुपये ३०० कोटीची औषध खरेदीची तरतुद मंजूर असताना केवळ २० ते ३० टक्केच औषधे खरेदी केली गेली असल्यामुळे अर्थसंकल्पीय अखर्चीत उत्पन्न रक्कमेवर साई संस्थानला नियमानुसार आयकर भरावा लागु शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले आहे व तद्नुसार सदर गैरव्यवहारासाठी जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१६-०४-२०२१) :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसंकल्पीय तरतुद खर्च न झाल्याची कारणे काय आहेत याची चौकशी करण्याकरीता लेखापरिक्षण पथक नेमण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कामोठे (ता.पनवेल जि रायगड) येथील ८५ एम.एल.डी, एस. टी. पी. प्लांट संदर्भात सिडकोच्या अधिकारी वर्गावर कारवाई करण्याबाबत

(२) ३२४३३ (०२-०२-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ८५ एम.एल.डी. एस. टी. पी. प्लांट महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमती मिळालेल्या पहिल्या ३ वर्षाच्या कालावधीसाठी स्थापन करण्यास म्हणजेच सन २०११ पर्यंत ८५ एम.एल.डी. घरगुती सांडपाण्यासाठी दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे काही सांडपाणी तयार होते त्याची विल्लेवाटाची प्रक्रिया न करता नदी, नाल्यामध्ये सोडले जाते व त्यामुळे सर्व जलस्थान हे खराब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या रुपयाचा कायद्यानुसार वापर न करता ठेकेदाराच्या आणि अधिकारांच्या फायद्यासाठी होत आहे असे दिसून येत आहे, याची पूर्ण जबाबदारी हि त्या अधिकाऱ्याची आहे त्यामुळे २०११ ते २०२१ पासून कार्यरत असणारे कार्यकारी अभियंता आणि सह अभियता यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे श्री.अडसुळे यांनी मा.नगर विकास मंत्री यांना दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.विलास बनकर हे कामोठे येथे कार्यकारी अभियंता असताना यांनी एस.टी.पी.प्लांट ची काही कामे काढली होती, सदर कामे हि ठेकेदाराच्या फायद्यासाठी काढली असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाण पत्र न घेता सदर कामे मंजूर केली. तसेच या स्थितीत असणारे कार्यकारी अभियंता, श्री.बी. एन.रामोड व कार्यकारी अभियंता, श्री.उदय घाटेराव हे देखील राष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाण पत्र न घेता एस.टी.पी. प्लांट चालवत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, एस.टी.पी.प्लांट मध्ये सांडपाणी वर होणाऱ्या प्रक्रिया सदर्भात शासनाचे नियमाप्रमाणे कामे न करणाऱ्या अधिकारी व ठेकेदार याचे वर विशेष चौकशी समिती स्थापन करुन दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून संमती प्रमाणपत्र (Consent to Establish) हे पुर्ण बांधकाम कालावधीकरीता दिले असुन सांडपाणी प्रक्रिया संयत्राचे (एस.टी.पी.) काम फेब्रुवारी, २०१२ रोजी पूर्ण झाले आहे. तसेच मैला / सांडपाण्यावर महाराष्ट्र प्रदुषण

नियंत्रण मंडळाच्या मालकानुसार प्रक्रिया करुन उपचारित जल (Treated Water) खाडीत सोडण्यात येते.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

मैला / सांडपाण्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक असल्याने ई-निविदा पध्दतीने Operation & Maintenance चे कंत्राट कामे देण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या दि.२.२.२०१६ च्या Consent to Operate प्रमाणपत्रानुसार दि.३१.१२.२०१६ पर्यंत संमती देण्यात आली आहे. त्यापुढील कालावधीसाठी प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी सिडकोमार्फत विहीत शुल्काचा भरणा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे करण्यात आला आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामात प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना सिडको प्रशासनाच्या सेवेत सामावून घेण्याबाबत

(३) ३२४४१ (१७-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सिडको प्रशासनामार्फत उभारण्यात येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामात सिडको प्रकल्पग्रस्त बेरोजगार अभियंताना सिडको प्रशासनात सामावून घेण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि. यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामात प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना प्रथम प्राधान्याने सिडको प्रशासनात सामावून घेणे हे सिडको प्रशासनाचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामात प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना सिडको प्रशासनाच्या सेवेत सामावून घेण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगारांना विमानतळ संबंधित प्रशिक्षण देणेची प्रक्रिया सिडकोकडे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मे. मर्कटाइल ॲडव्हर्टायझिंग या खासगी जनसंपर्क संस्थेची नियुक्ती करुन पैशांची उधळपटटी केली असल्याबाबत

(४) ३२५०३ (०२-०२-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) स्वत:चा स्वतंत्र जनसंपर्क विभाग असतानाही मे. मर्कटाइल ॲडव्हर्टायझिंग या खासगी जनसंपर्क संस्थेची नियुक्ती करुन पैशांची उधळपटटी केली असल्याचे माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना काळात प्रकल्पाचे काम मंदावले असतांनाही या संस्थेवर दोन वर्षात ५ कोटी २१ लाख रुपये खर्च करण्यात आला असून दर महिन्याला २१ लाख ७० हजार रुपये अदा केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेला आजमितीला दिलेल्या कोटयावधी रुपयांच्या कामाचे लेखापरिक्षण करण्याबाबत माहीती अधिकार कार्यकर्ते श्री.अनिल गलगली यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा नगरविकास मंत्री व महानगर आयुक्त यांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीअंती मे. मर्कटाइल ॲडव्हर्टायझिंग या खासगी संस्थेला काम देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०६-२०२२) : (१) महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ अन्वये शासनाच्या विविध विभागांच्या योजनांसाठी प्रसिद्धी तसेच जाहिरात विषयक कार्ये पार पाडण्यासाठी जाहिरात संस्थांची सूची प्रसिद्ध केली आहे. सदर सूचींमधील मुद्रित, दृकश्राव्य आणि श्राव्य माध्यमांच्या कामांकरीता संवर्ग-अ मधील ११ मोठ्या संस्थांमधून विहीत पद्धतीने

तुलनात्मकरित्या मे. मर्कंटाईल ॲडव्हर्टायझिंग या संस्थेची नियुक्ती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी सोशल मिडिया आणि प्रसारमाध्यमाच्या कामाकरीता करण्यात आलेली आहे.

(२) मे. मर्कंटाईल ॲडव्हर्टायझिंग या संस्थेला दि. १५.०७.२०१९ ते दि. १८.०८.२०२१ या कालावधीत सुमारे रूपये ५.२१ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. सदरची रक्कम कामाच्या स्वरूपानुसार अदा करण्यात आलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे लेखापरीक्षण महालेखापरीक्षक कार्यालयाकडून वैधानिक लेखापरीक्षण करण्यात येते. मे. मर्कंटाईल ॲडव्हर्टाझिंग या संस्थेला प्राधिकरणाने दिलेल्या सदरहू कामाचे वैधानिक लेखापरीक्षण करण्याबाबत महालेखापरीक्षक कार्यालयास प्रस्तावित करण्यात आले आहे.

राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील शाखा अभियंत्यांच्या पदस्थापनेच्या आदेशाबाबत

(५) ३२५१६ (११-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ व शाखा अभियंता अशा एकूण २०० अधिकाऱ्यांना दि. १२ नोव्हेंबर, २०२० रोजी पदोन्नतीनंतरही पदस्थापना दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रकरणी दिनांक १७ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासूमारास शासनाने ५१ पदोन्नत सहाय्यक अभियंत्यांना विभागीय अभियंतापदी पदस्थापनेचे आदेश दिले आहेत, हेही खरे आहे काय,

(३) परंतु, १४१ शाखा अभियंत्यांच्या पदस्थापनेचे आदेश काढलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व १४१ शाखा अभियंत्यांच्या पदस्थापनेचे आदेश त्वरीत काढण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

५. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०८-०६-२०२२) : (१), (२), (३) व (४)

सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गातून उप विभागीय अभियंता या पदावर आणि कनिष्ठ अभियंता संवर्गातून उप विभागीय अधिकारी या पदावर फक्त पदोन्नती देण्याचे आदेश

दिनांक १२/११/२०२० रोजी निर्गमित करण्यात आले होते. सदर अभियंत्यांचे पदोन्नती उपरांत पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील असे आदेशात नमूद करण्यात आले होते. त्यानंतर दिव्यांग कर्मचा-यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देणे या विषयाबाबत मा. उच्च न्यायालयातील प्रकरणामुळे उपरोक्त अधिका-यांना पदस्थापना देता आली नव्हती.

तद्नंतर सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गातून पदोन्नती देण्यात आलेल्या ५१ अभियंत्यांना दिनांक ०७/१०/२०२१ व दिनांक १३/१०/२०२१ रोजीच्या आदेशान्वये उप विभागीय अभियंता या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे. तसेच, कनिष्ठ अभियंता संवर्गातून पदोन्नती देण्यात आलेल्या १४१ अभियंत्यांना दिनांक ०३/१२/२०२१ व दिनांक २८/०४/२०२२ रोजीच्या आदेशान्वये उप विभागीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई प्रकल्पग्रस्ताच्या हिताचा निर्णय घेऊन ग्रामस्थांना दिलासा देण्याबाबत

(६) ३२५७६ (०१-०२-२०२२). श्री.गणेश नाईक (ऐरोली) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील मूळ गावठाण व विस्तारित गावठाणातील प्रकल्पग्रस्तानी गरजेपोटी केलेली सर्व बांधकामे नियमिती करण्यासाठी शासनाने समूह विकास योजना जाहीर केली परंतु सदर योजनेमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या हितांच्या अनेक बाबींचा अंतर्भाव नसल्याने सदरच्या योजनेस ग्रामस्थांचा विरोध असल्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता, नवी मुंबई क्षेत्रातील लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त आणि त्यांच्या संघटनांनी याबाबत हरकती व सूचना दिलेल्या असून लोकप्रतीनिधींची वेळीवेळी निवेदने प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिसूचनेच्या फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून अंतिम निर्णय शासन स्तरावर विचाराधीन असल्याचे लेखी उत्तर दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी केलेली सर्वच बांधकामे नियमित होण्याकरिता ग्रामस्थांशी चर्चा करून मूळ गावठाणाबरोबरच विस्तारित गावठाणातील प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी धारण केलेल्या महसुली जमिनीचे सर्वेक्षण करून त्यांना मालकी हक्क देण्यात यावा यासाठीचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने दिलेल्या उत्तरानुसार प्रकल्पग्रस्तांच्या हितांच्या

बाबींच्यादृष्टीने, लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त आणि त्यांच्या संघटनांनी, जनतेने दिलेल्या हरकती व सूचनांचा समावेश असलेली सुधारित अधिसूचना लवकरात लवकर काढण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शासनाच्या दि.१६.३.२०१७ च्या पत्रामधील निर्देशानुसार जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड यांचेस्तरावर सर्व्हेक्षणाची कार्यवाही सुरु आहे.
(४) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधकाम केलेल्या घरांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतचा शासन निर्णय दि.२५.२.२०२२ रोजी निर्गमीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील लोअर परळ येथील ना.म.जोशी मार्गावरील बी.डी.डी.चाळ पुर्नविकासाचा काम सुरु झाले नसल्याबाबत

(७) ३२८३७ (११-०१-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लोअर परळ येथील ना.म.जोशी मार्गावरील बी.डी.डी.चाळ पुर्नविकासाचा शुभारंभ करुन तीन हून अधिक वर्षे लोटली असतानाही सदर प्रकल्पाचे काम अद्यापपर्यंत सुरु झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पातील २०५ रहिवाशी वरळी येथील संक्रमण शिबिरात स्थलांतरित झाले असून राज्य शासन प्रकल्पाचे काम सुरु करत नसल्यामुळे उर्वरित रहिवाशी संक्रमण शिबिरात जाण्यास तयार नसल्याची बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरळी, ना.म.जोशी मार्ग, नायगांव आणि शिवडी अशा चार ठिकाणी बीडीडी चाळीच्या २०७ इमारती असून त्यांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय शासनाने

घेतला मात्र शिवडी येथील पाच एकरावर वसलेल्या १२ इमारतीचा विकास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरळी येथील बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासाच्या धर्तीवर लोअर परळ येथील ना.म.जोशी मार्गावरील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (०३-०६-२०२२) : (१) हे खरे आहे .

(२) ना.म. जोशी मार्ग प्रकल्पातील २८१ रहिवाशांनी म्हाडाच्या संक्रमण शिबिरात स्थलांतर केले आहे. काही रहिवाशी कायमस्वरूपी सदनिकेचा करारनामा करून त्याच्या नोंदणीकरणानंतरच संक्रमण शिबिरात स्थलांतरण करण्यास तयार आहेत. तर संक्रमण शिबीर गाळयासाठी व कायमस्वरूपी गाळयासाठी एकच करारनामा असावा, अशी काही रहिवाश्यांची मागणी आहे.

(३) वरळी, ना. म. जोशी मार्ग, नायगांव आणि शिवडी येथील बी. डी. डी.चाळींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे .

शिवडी येथील बी. डी. डी. चाळींच्या इमारतींचा विकास करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आलेली नाही .

(४) व (५) संक्रमण शिबीर गाळे गाळयांचे वितरण होऊनही संक्रमण शिबीरात स्थलांतरीत न झालेल्या काही रहिवाश्यांविरूद्ध महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम ,१९७६ मधील कलम ९५(अ) अन्वये निष्कासनाची कारवाई सुरू करण्यात आली आहे . पुनर्वसन इमारतीचे काम सुरू करण्याकरीता प्रकल्पातील उपलब्ध मोकळया जागेभोवती दि.२३.०२.२०२२ रोजी पोलीस बंदोबस्तात बॅरीकेडस् उभारण्यात आले असून प्रत्यक्ष शोअर पाईलिंगचे काम करण्याची तयारी सुरू आहे .

राज्यातील विशेषत: अहमदनगर महापालिका हद्दीतील कोविड रुग्णांकडून आकारलेली जास्तीचे देयके परत करण्याबाबत

(८) ३३४८६ (०२-०२-२०२२). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अहमदनगर महापालिका हद्दीतील कोविड रुग्णांकडून आकारलेली जास्तीचे देयक परत करण्यास टाळाटाळ करणाऱ्या मोठ्या रुग्णालयांना अंतिम नोटिस बजावण्यात येणार असल्याची बाब माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी महापालिका आयुक्तांनी रुग्णालय प्रतिनिधीची बैठक घेऊन ही अद्याप पाच रुग्णालयांनी कोविड रुग्णांची जास्तीची देयक परत केली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील तसेच राज्यभरातील कोविड रुग्णांची जास्तीची देयके घेऊनही परत न करणाऱ्या रुग्णालयांवर महापालिका व नगरपरिषदांच्या अधिकाऱ्यांनी आढावा बैठक घेवून जास्तीची देयक परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०२-०६-२०२२) :(१) व (२) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आदेशानुसार अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोरोना बाधीत रुग्णांची देयके तपासणीसाठी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

सदर समितीमार्फत देयके तपासणी अंती एकूण १७ रुग्णालयांना जास्तीचे देयक परत करण्याबाबत नोटीसा देण्यात आल्या होत्या.

तसेच, यासंदर्भात महापालिका आयुक्तांनी रुग्णालय प्रतिनिधी यांचेसोबत वेळोवेळी बैठका घेऊन परताव्याबाबत निर्देश दिलेले होते.

त्यानुसार १० रुग्णालयांनी त्यांचेकडील संपुर्ण परतावा रक्कम रुग्ण/रुग्णाचे नातेवाईक यांना परत केलेली आहे. तसेच ०४ रुग्णालयांनी अंशत: परतावा दिला असून पुर्ण परतावा देण्यासाठी अतिरिक्त मुदत मागितलेली आहे.

उर्वरित ०३ रुग्णालयांनी परताव्याची रक्कम अद्याप परत केलेली नसून, त्यापैकी एका रुग्णालय धारकांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली आहे.

ज्या रुग्णालयांनी अतिरिक्त देयकाची रक्कम रुग्ण/रुग्णाचे नातेवाईक यांना परत केली नाही अशा रुग्णालयांना महानगरपालिकेकडून महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी कायद्यानुसार नोटीसा देण्यात आल्या आहेत.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२१/०५/२०२० च्या अधिसूचनेनुसार, कोव्हीड रुग्णाच्या उपचाराकरीता कमाल दर निश्चित केले आहेत.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने खाजगी रुग्णालयांतील देयके तपासणीसाठी राज्यातील सर्व महानगरपालिकांमध्ये लेखा परीक्षण पथकांची नियुक्ती

करण्यात आलेली आहे.

सदर लेखापरीक्षण पथकांमार्फत कोविड रुग्णांच्या सर्व देयकांचे लेखापरीक्षण करण्यात येते व त्यानंतर देयके अंतिम केली जातात.

सदर देयकात जादा आकारणी झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर रकमा परत करण्याबाबत संबंधित रुग्णालयास नोटीस देण्यात येते.

यासंदर्भात वेळोवेळी महानगरपालिका प्रशासन व संबंधित रुग्णालय प्रतिनिधी यांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात येतात.

तसेच ज्या रुग्णालयांमार्फत रुग्णांस देयकाची अतिरिक्त रक्कम परत करण्यात येत नाही, त्यांची कोविड रुग्णालयाची परवानगी रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

तसेच, राज्यातील ४०२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी ३३१ संस्थांनी, कोविड रुग्णालयांनी रुग्णांकडून जास्तीची देयके आकारल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंजनगांव (जि.अमरावती) वनपरिक्षेत्रात वनरक्षकांसह वनमजूरांची पदे रिक्त असल्याबाबत

(९) ३४०७७ (११-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील अंजनगांव वनपरिक्षेत्रात वनरक्षकांसह वनमजूरांची पदे रिक्तअसल्याने जंगलाची सुरक्षा धोक्यात आली असल्याचे दि. ७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वनरक्षकांची निम्म्याहून अधिक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेवून येथील वनरक्षकांची पदे तातडीने भरण्यासह येथे वनमजूर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१४-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही

अमरावती वनवृत्तांतर्गत मेळघाट प्रादेशिक विभागातील अंजनगाव परिक्षेत्रामध्ये

वनरक्षकांची २२ पदे मंजूर असून, त्यापैकी १४ पदे कार्यरत आहेत. तसेच वनमजूरांची १२ पदे कार्यरत आहेत. अंजनगाव परिक्षेत्रात वनपालांची ५ मंजूर पदे सुध्दा कार्यन्वित आहेत. त्यामुळे वनरक्षकांची निम्म्याहून अधिक पदे रिक्त नाहीत.

(३) कोविड-१९ विषाणू संसर्गाच्या महामारीमुळे पदभरती करण्यास निर्बंध घालण्यात आले होते. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १२.०४.२०२२ अन्वये सदरचे निर्बंध उठविण्यात आले असून रिक्त पदांच्या ५० टक्के पदे भरण्यास अनुमती देण्यात आली आहे. वनरक्षक हे सरळसेवेचे पद असून, सदर संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे ते बोरिवली दरम्यान भूमिगत रस्ता मार्ग बांधण्याच्या प्रकल्पाबाबत

(१०) ३४१५५ (०२-०२-२०२२). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे ते बोरिवली दरम्यान भूमिगत रस्ता मार्ग बांधण्याचा प्रकल्प एक वर्षापूर्वी एमएसआरडीसीकडून एमएमआरडीएकडे हस्तांतरित करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी जमीन संपादनाची प्रक्रिया ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सुरु करण्यात आलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्ष प्रकल्पाच्या कामास केव्हापासून सुरूवात होणार असून, याकरीता किती कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे व सदरचा प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०६-२०२२) :(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यावर तसेच भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदर प्रकल्पाचे काम हाती घेण्याचे नियोजित आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर (PPP) करण्यात येणार असून प्रकल्पासाठी एकूण अंदाजित किंमत रू. ११२७०.८८/- कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्प पाच वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

सन २०१९ च्या हिवाळी अधिवेशनाचे दोन वर्षापासून केलेल्या कामाचे कंत्राटदारांचे देय थकित असल्याबाबत

(११) ३४३३५ (११-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१९ च्या हिवाळी अधिवेशनाचे दोन वर्षापासून केलेल्या कामाचे कंत्राटदारांचे देयक थकित असल्याचे दि. ९ सप्टेंबर २०२१ ला निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकित देयक त्वरित देण्याच्या मागणीसाठी कंत्राटदारांनी राज्यभरात निदर्शने केली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नागपूर विभागातच ६०० कोटी रूपयांची थकबाकी आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंत्राटदरांचे देयके शासन तातडीने देणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

श्री. अशोकराव चव्हाण (१६-०२-२०२२) : (१) व (२) खरे आहे,

(३) नाही. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांच्या दि.१०.१२.२०२१ च्या पत्रानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर येथे सन २०१९ च्या हिवाळी अधिवेशनाची रू.३.७८ कोटी इतक्या रकमेची देयके प्रलंबित आहेत.

(४) व (५) निधीच्या उपलब्धतेनुसार संबंधितांना प्रलंबित देयके अदा करण्याची कार्यवाही नियोजित आहे.

ठाणे महापालिका हदीतील पिण्याच्या पाण्याबाबत

(१२) ३४५०९ (०२-०२-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका हदीत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत असून पाणी साठ्याची भविष्यात तरतूद नसल्याने वाढत जाणाऱ्या नागरी वस्तीला अपुरा पाणी पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासन व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या योग्य समन्वयाअभावी येथील हिरानंदानी, लोढा, अमारा, कोलशेत व माजिवडा परिसरात पाणी प्रश्न गंभीर रूप धारण करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अनेक वेळा पाणी प्रश्नाबाबत नागरीकानी मोर्चे, आंदोलने, उपोषण करूनही तेथील पाणी प्रश्न सोडविण्यात शासन व प्रशासन अपयशी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचा पाणी प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०२-०६-२०२२) : (१) ठाणे महानगरपालिकेने भविष्यातील वाढत्या लोकसंख्येसाठी अतिरिक्त पाणी पुरवठा होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करत असल्याची बाब कळविली आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेमार्फत हिरानंदानी इस्टेट, कोलशेत व माजिवडा या भागास पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर भागास होणारा पाणी पुरवठा सद्यस्थितीत पुरेसा व योग्य प्रमाणात आहे.

तसेच लोढा अमारा या गृहसंकुलास पाणी पुरवठा एम.आय.डी.सी.व ठाणे महानगरपालिका यांच्या समन्वयाने केला जात असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) व (४) ठाणे महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा वाढविण्याबाबत खालील कार्यवाही सुरू आहे:-

(१) ठाणे महानगरपालिकेने भातसा धरणातून अतिरिक्त १०० द.ल.लि. प्रतिदिन वाढीव पाण्याचा कोटा वाढविण्याबाबत महानगरपालिकेचा जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे.

(२) ठाणे महानगरपालिकेने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे कायमस्वरुपी अतिरिक्त १०० द.ल.लि. प्रतिदिन वाढीव पाण्याचा कोटा मिळण्याबाबत विनंती केली आहे.

परभणी शहरामध्ये रिलायन्स जिओ प्रायव्हेट लिमिटेड व स्टारलाईट टेक या खाजगी दूरसंचार कंपनीने महापालिकेची परवानगी न घेता केबल टाकल्याबाबत

(१३) ३४७७८ (०२-०२-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरामध्ये रिलायन्स जिओ प्रायव्हेट लिमिटेड व स्टारलाईट टेक या खाजगी दूरसंचार कंपनीने महानगरपालिकेची पूर्व परवानगी न घेता केबल टाकण्यासाठी महत्त्वाच्या रस्त्याचे खोदकाम केल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता केबल टाकण्यासाठी महत्वाच्या रस्त्याचे खोदकाम करणाऱ्या सदरहू कंपन्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०२-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

परभणी शहर महानगरपालिकेने मे.जियो डिजिटल लाईफ यांनी वेळोवेळी केलेल्या अर्जानुसार त्यांना OFC केबल टाकण्याची मान्यता दिली आहे.

मे.स्टारलाईट टेक या खाजगी दूरसंचार कंपनीने केबल बसवण्याकरीता कोणतीही परवानगी मागितली नसून कोणतेही काम केलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी रिंगरोड प्रकल्पास मंजुरी मिळण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१४) ३४९०० (०२-०२-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडीतील रिंग रोड प्रकल्पाचे काम अद्यापपर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडीतील वाहतूक कोंडीमुळे भिवंडी रिंगरोड प्रकल्पास मंजुरी मिळण्याबाबत व निधी उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व नगरविकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१४-०६-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकल्पाबाबत मा.मंत्री (नगर विकास) यांचे अध्यक्षतेखाली दि.२५/५/२०२१ रोजी बैठक घेण्यात आली असुन सदरचे काम मार्गी लावण्याचे दृष्टीने पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) अद्यापी कामास प्रारंभ झालेला नसल्यामुळे विलंबांचा प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या अनुषंगाने स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणेबाबत

(१५) ३५०१० (१७-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या अनुषंगाने स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा दीर्घकालीन आराखडा विजन २०४० वन विभागामार्फत तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आराखड्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व आराखड्यात शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(३) अद्याप, शासनाने मंजूरी दिली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत वा याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०६-२०२२) : (१) उत्तम संवर्धन मुल्य, पर्यावरणाचा समतोल राखणे याबरोबरच मुख्यत: शेती, निसर्ग पर्यटन आणि तत्सम आर्थिक बाबींवर अवलंबून असलेल्या आजुबाजुच्या गावांच्या आर्थिक उत्पान्नावर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे महत्वाचे योगदान आहे.

व्याघ्र संवर्धन योजने (Tiger Conservation Plan) व्यतिरीक्त व्याघ्र प्रकल्पाच्या आजुबाजुच्या प्रदेशासाठी संपुर्ण पर्यावरणीय आणि आर्थिक क्षमता आणि दिर्घकालीन उद्दीष्टे साध्य करण्यासाठी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठानच्या व्यवस्थापनाच्या सर्व पैलुचा समावेश करणारा दीर्घकालीन मार्गदर्शक आराखडा आवश्यक आहे.

त्यादृष्टीने ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा दुरगामी आराखडा विजन २०४० तयार करण्याची प्रक्रिया क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

अमरावती वनविभागातील उपवनसंरक्षक व सहाय्यक वनसंरक्षक या दोघांविरूध्द असलेल्या तक्रारीबाबत

(१६) ३५८०० (११-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती वनवृत्ताअंतर्गत अमरावती वनविभागातील उपवनसंरक्षक व सहाय्यक

वनसंरक्षक या दोघांविरूध्द तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. प्रधान सचिव (वने) यांचेकडे दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही झाली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१५-०६-२०२२) :(१) अंशत: खरे आहे.

श्री सुधीर मुनगंटीवार, विधानसभा सदस्य यांच्या दिनांक ०३.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव वने यांना सदर तक्रार अर्ज पाठविण्यात आला आहे.
(२) उक्त तक्रार अर्ज महसूल व वन विभागास दिनांक ०६.१२.२०२१ रोजी प्राप्त झाला असून सदर तक्रार अर्जास अनुसरून दिनांक ०८.१२.२०२१, दिनांक २८.०१.२०२२ व दिनांक १५.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयाकडून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल पाठविणेबाबत कळविण्यात आले आहे.
(३) त्यानुसार विभागीय वन अधिकारी, दक्षता, अमरावती यांनी दिनांक ०७.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.) अमरावती यांना अहवाल सादर केला आहे. सदर चौकशी अहवालामध्ये नोंदविण्यात आलेले जबाब व मुख्य वनसंरक्षक (प्रा.) अमरावती, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा अमरावती वनवृत्त पालक आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) यांनी दिलेले अभिप्राय विचारात घेता सदरची तक्रार ही वस्तुस्थितीला धरून नसल्याचे दिसून आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र सप्तशृंगी गड परिसरात अज्ञात तस्करांकडून मोरांची तस्करी होत असल्याबाबत.

(१७) ३५८११ (११-०१-२०२२). डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र सप्तशृंगी गड परिसरात अज्ञात तस्करांकडून मोरांची तस्करी होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाला कळवूनही अद्यापपर्यंत याची दखल न घेतल्याने शेतकरी व गावकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रार करूनही त्याची दखल न घेणा-या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मोरांची तस्करी करणा-यांना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०६-२०२२) : (१) नाशिक जिल्ह्यातील श्रीक्षेत्र सप्तश्रुंगी गड परिसरात राहणारे श्री. विठ्ठल दौलत भरसट यांनी सदर परिसरात मोरांची तस्करी होत असल्याचा अंदाज दिनांक ३१.०७.२०२१ रोजी समाज माध्यमांमध्ये प्रसारीत केलेल्या चित्रफितीद्वारे वर्तविला होता. तथापि अशी घटना झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०१.०८.२०२१ रोजी वन विभागाचे क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांनी सदर इसमाची प्रत्यक्ष भेट घेवून विचारणा केली असता श्री. भरसट यांनी रात्रीच्या वेळी मोरांचा आवाज ऐकु येत असल्यामुळे मोरांची तस्करी होत असल्याचा अंदाज वर्तविला परंतु सदर घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिले नसल्याचे देखील कबुल केले. या बाबीची दखल घेवून क्षेत्रिय कर्मचाऱ्यांमार्फत सदर परिसरात गस्त करण्यात आली व अशी घटना निदर्शनास आल्यास वन विभागास तात्काळ कळविण्याबाबत ग्रामस्थांना सुचित करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील विनावापर असलेल्या सरकारी इमारती वापरात आणणेबाबत

(१८) ३५९१० (११-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक ठिकाणी विनावापर किंवा अर्धवट बांधकाम असलेल्या सरकारी इमारती पडून असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे का,
(२) असल्यास, अशाप्रकारच्या इमारतींची नोंद तसेच सदरील इमारती वापरात नसण्याची कारणे याबद्दलची माहिती शासनाकडे उपलब्ध आहे काय,
(३) असल्यास, सदरील इमारती वापरात आणण्यासाठी शासन राबवत असलेल्या उपाययोजना काय आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०७-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) राज्यात काही ठिकाणी निधी अभावी, फर्निचर अभावी, सुधारीत प्रशासकीय मान्यता

प्राप्त नसल्याने आणि मागणी अभावी काही इमारती अर्धवट/ विनावापर आहेत. अर्धवट बांधकाम असलेल्या/ विनावापर इमारतीबाबतची नोंद संबंधीत प्रादेशिक विभाग स्तरावर/ जिल्हास्तरावर घेण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) सदर इमारती वापरात आणण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याचे शासनस्तरावर वेळोवेळी नियोजन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाथर्डी (जि.औरंगाबाद) तालुक्यात अतिवृष्टीमुळे कन्नड-नागद गौताळा घाटात दरड कोसळल्याने रस्त्यांची झालेली दुरावस्था

(१९) ३६३५५ (११-०१-२०२२). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथर्डी (जि.औरंगाबाद) तालुक्यात दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे कन्नड-नागद गौताळा घाटात दरड कोसळल्याने दोन महिन्यापासून रस्त्यांच्या दोन्ही बाजूला खच पडला असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडल्याने अपघाताचेही प्रमाण वाढले आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी वारंवार संबधितांकडे करुनही अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आली आली नाही हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०८-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
दरड कोसळल्यानंतर २४ तासाच्या आत रस्त्यांच्या दोन्ही बाजुच्या लगत पडलेली दरडी काढून टाकण्यात आली असून रस्ता वाहतूक वर्दळीस सुरळीत करण्यात आलेला आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) क्षतिग्रस्त झालेल्या रस्त्याच्या दुरुस्ती करिता रु.१४०.०० लक्ष रकमेच्या कामांना मंजूरी देण्यात आली असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम कार्यान्वयीत करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता दोन मजल्याच्या इमारतीचे अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

(२०) ३६४११ (०२-०२-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रातील सिटी सर्व्हे क्रमांक ८५३२ स.नं.५२/अ (भाग) असदुल्लाबाद, कैलास नगर, नांदेड येथे महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता श्री.मारोतराव बाबुराव नळगे यांनी ३३२.४७ चौ.मी. क्षेत्र जागेवर तळ मजला + दोन मजल्याच्या इमारतीचे अनधिकृत बांधकाम केल्याची बाब माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत व सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित न केल्यास फौजदारी कारवाई करण्यात येईल अशी नोटीस महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त, क्षेत्रीय कार्यालय-२, अशोक नगर, नांदेड यांनी श्री.नळगे यांना जारी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकाम अद्याप निष्कासित करण्यात आलेले असून श्री.नळगे यांचेवर अद्याप कोणतीही फौजदारी कारवाई करण्यात आली नसून श्री.नळगे हे सदरहू इमारतीचा सद्य:स्थितीत बेकायदेशीर वापर करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकाम तातडीने निष्कासित करून श्री.नळगे यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याबाबत श्री.बापुराव देवराव डुकरे पाटील यांनी माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांचेकडे तक्रार अर्ज सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदरहू चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व श्री.नळगे यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०२-०६-२०२२) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

श्री.नळगे यांनी सिटी सर्व्हे क्र.८३५२ वर यापूर्वी मान्यताप्राप्त १६९०.९६ चौ.मी. बांधकामाव्यतिरिक्त ३३२.४७ चौ.मी. क्षेत्रावर अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना दिनांक ३०.९.२०२० रोजी नांदेड वाघाळा महानगरपालिकाद्वारे नोटिस बजावण्यात आली.

(३) हे खरे आहे.

श्री.नळगे यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) व ५४ अन्वये दिनांक १०.५.२०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली. महानगरपालिकेने दिलेल्या नोटिस विरुध्द श्री.नळगे यांनी दिनांक ३.१.२०२० रोजी मा.दिवाणी न्यायालय, नांदेड येथे याचिका दाखल केली असून मा.न्यायालयाने दिनांक १६.२.२०२१ रोजी मालमत्तेच्या वादाचा निकाल लागेपर्यंत कोणताही हस्तक्षेप करु नये असे आदेश पारित केले आहेत.

४) हे खरे आहे.

५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हयातील आमडी-सावनेर महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

(२१) ३८२११ (१९-०४-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपूर अंतर्गत असलेल्या आमडी-सावनेर या महामार्गावर जागोजागी खड्डे व भेगा पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यंत्रणेमार्फत दुरूस्ती करतेवेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने फलक न लावण्यात आल्याने वारंवार गंभीर अपघात घडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यंत्रणा व राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपूर येथील अधिका-यांच्या निष्काळजीपणामुळे अपघात घडत असल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०१-०६-२०२२) : (१) आमडी-सावनेर राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ मधील दुपदरी सिमेंट कॉक्रिट पेव्हड शोल्डर रस्त्याचे काम पूर्णत्वास असून उक्त मार्गातील काही ठिकाणी भेगा पडल्याची बाब खरी आहे.

(२) , (३) व (४) सदर रस्त्यावरील भेगा पडलेल्या ठिकाणच्या तपासणीनुसार भेगांची तीव्रता विचारात घेवून आवश्यकतेनुसार कंत्राटदाराच्या स्वखर्चाने काही ठिकाणची काँक्रिट पॅनेल्स तोडून नव्याने पॅनेल्स बांधणेबाबत तसेच काही ठिकाणची आवश्यक दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच सदर दुरुस्ती करताना सुरक्षिततेच्या दृष्टीने फलक व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून दुरुस्तीच्या ठिकाणी अपघात

झाल्याची नोंद निदर्शनात नाही.

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे.यांनी नागरी सेवा नियमांच्या तरतुदीचा भंग करत असल्याबाबत

(२२) ३८५३४ (१८-०४-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे हे राजशिष्टाचार पाळत नसून नागरी सेवा नियमांच्या तरतुदीचा भंग करत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, हायब्रीड अॅन्युटी (HAM) योजनेतील पॅकेज-२४ व २५ अंतर्गत रस्त्याचे कामाबाबत त्यांना अनुक्रमे (१) दि.०७/११/२०१९ जा.क्र.७८२ (२) दि.२७/१२/२०१९ जा.क्र.११०७/२९ (३) दि.११/०९/२०२० जा.क्र.१४९६/२०२० (४) दि.२२/०६/२०२० जा.क्र.१३१०/२० (५) दि.०३/११/२०२० जा.क्र.१८४५/२०२० नुसार ५ वेळा लेखी पत्रव्यवहार तसेच स्थानिक पदाधिकारी, नागरिकांनी निवेदने देऊन देखील कोणतीही कार्यवाही त्यांच्याकडून झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे हे त्यांच्या कर्तव्यात कसूर करत असून त्यांच्या अखत्यारीत असलेल्या हायब्रीड अॅन्युइटी कामांमधील त्रुटी व अनियमितता होत असून शासनाची होणारी फसवणूक रोखण्यासाठी त्यांना लेखी पत्राद्वारे निदर्शनास आणून देखील ते कंत्राटदारास पाठीशी घालत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना देखील याबाबत चौकशी करण्याकरिता दिनांक १ जून, २०२१ नुसार जावक क्र.३८२९ ने लेखी पत्रव्यवहार केला असून उक्त प्रकरणात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०७-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन कामाबाबत प्राप्त पत्राच्या अनुषंगाने व त्यातील सुचनांनुसार केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय कार्यालयाकडून दि.०७/१२/२०२० च्या पत्रान्वये मा. लोकप्रतिनिधी यांना अवगत करण्यात आले आहे. सद्यस्थितीत प्रश्नाधीन रस्त्यांची कामे ९५ टक्के भौतिक प्रगती साध्य केली आहे.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे वनवृत्त अंतर्गत असलेल्या जिल्हयातील वनजमिनीची मोजणी कामासाठी वनसर्वेक्षकांचा अभाव असल्याबाबत

(२३) ३८५९६ (१०-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे वनवृत्त अंतर्गत असलेल्या जिल्हयातील काही उपवन संरक्षक कार्यालयात वनजमिनीची मोजणी कामे करण्यासाठी गेल्या चार-पाच महिन्यांपासून वनसर्वेक्षकांचा अभाव असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे अनेक विकासकामे प्रलंबित आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वनसर्वेक्षकांचा अभाव दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१४-०६-२०२२) : (१), (२) व (३) ठाणे वनवृत्तात सर्वेक्षक संवर्गातील १६ पदे रिक्त असून, कार्यरत सर्वेक्षकांकडून तसेच जव्हार वनविभागातील सर्वेक्षक यांना अतिरिक्त कार्यभार देऊन ठाणे वनवृत्तात कामे करुन घेण्यात येत आहेत.

या उपाययोजनेमुळे विकास कामे प्रलंबित नाहीत. कोविड-१९ विषाणू संसर्गाच्या महामारीमुळे शासकीय पदभरतीवर निर्बंध घालण्यात आले होते. तथापि, शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १२.०४.२०२२ अन्वये सदरचे निर्बंध उठविण्यात आले असून रिक्त पदांच्या ५० टक्के पदे भरण्यास अनुमती देण्यात आली आहे. सर्वेक्षक हे सरळसेवेचे पद असून, ठाणे वनवृत्तातील सर्वेक्षक संवर्गाची पदे तातडीने भरण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरेड (जि.यवतमाळ) येथील रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता निधी मंजूर करण्याबाबत

(२४) ३८६६५ (१९-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेड (जि.यवतमाळ) येथील ३९ वनग्राम असून तो भाग बंदीभाग म्हणून ओळखला

जात असून या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत हिवाळी अधिवेशन, २०१९ मध्ये मा. मुख्यमंत्री यांनी निधी मंजूर करुन देण्याचे आश्वासन देऊन अद्यापही निधी मंजूर करण्यात आला नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या दालनात बैठक आयोजित करण्याचे निवेदन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने निधी मंजूर केला आहे काय याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच किती रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०८-०६-२०२२) : (१) मा.मुख्यमंत्री यांनी यवतमाळ जिल्ह्याच्या दि.१६.१२.२०१९ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत सदर रस्त्यांकरीता आवश्यक निधी उपलब्ध करून देणेबाबत निर्देश दिले आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे बैठक आयोजित करणेबाबत निवेदन प्राप्त नाही.

(२) व (३) निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार कामे मंजुर करून हाती घेण्याचे नियोजन आहे.

मुंबईतील वरळी येथील १४ इमारतींचा सर्व्हे करुन १ हजार १२० रहिवाशांची पात्रता निश्चिती पूर्ण करण्याबाबत

(२५) ३८८०२ (१९-०४-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय पोतनीस (कलिना) सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील १४ इमारतींचा सर्व्हे करुन १ हजार १२० रहिवाशांची पात्रता निश्चिती पूर्ण करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या पुनर्विकास लवकर पूर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१५-०६-२०२२) : (१) वरळी बी. डी. डी. चाळ पुनर्वसन प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यातील १४ चाळींमधील ११२० गाळयांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून सक्षम प्राधिकारी यांनी १००६ पात्र रहिवाशांची अंतिम पात्रता यादी प्रसिद्ध केली आहे.

(२) व (३) पुनर्वसन इमारत क्र. १ करीता बी.डी.डी. चाळ क्र. ३० व ३१ मधील १६० गाळ्यांची संगणकीय वितरण सोडत काढण्यात आली आहे.

आतापर्यंत बी.डी.डी. चाळ क्र. ३० व ३१ मधील एकूण ९२ भाडेकरुंनी संक्रमण गाळ्याचा करारनामा तसेच मालकी हक्काच्या सदनिकेबाबतचा करारनामा पंजीकृत केलेला आहे. करारनामा केलेल्या भाडेकरूंना संक्रमण इमारतीमध्ये स्थलांतरित करण्यात येणार आहे.

उर्वरित चाळींमधील रहिवाशांची संगणकीय सोडत, करारनामा पंजीकरण व स्थलांतरण करण्यात येणार आहे. तद्नंतर त्यांची जुनी चाळ पाडण्यात येऊन पुनर्विकास इमारतीचे काम सुरु करण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत पुनर्वसन इमारत क्र . १ मधील "डी" व "ई" विंग चे पाईलिंगचे काम प्रगतीपथावर आहे .

ठाणे जिल्ह्यात वनऔषधी झाडांची तस्करांकडून बेकायदेशीर वृक्षतोड होत असल्याबाबत

(२६) ३८९५४ (१८-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात कसारा, विहीगाव, वॉशाळा, खर्डी वन परिक्षेत्रातील विहीरीचा पाडा, आंब्याचा पाडा, शिरोळ, उबरमाळी, मोखावणे, राड्याचा पाडा, शिवाजी नगर आणि कासार पाणी पुरवठा क्षेत्रालगतच्या घनदाट जंगलात मोठ्या प्रमाणात खैर, साग, पळस, निलगिरी, आंबा, आपटा, बांबू, कडूलिंब यासह वनऔषधी झाडांची तस्करांकडून बेकायदा वृक्षतोड आणि पार्टीसाठी येणाऱ्या लोकांकडून आग लावण्याच्या होत असलेल्या प्रकारामुळे जंगल उध्दवस्त होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे याप्रकरणी वृक्षप्रेमी आणि सामाजिक संस्थांनी या जंगलात लावलेले वृक्षही तस्करांनी तोडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वन परिक्षेत्रातील वृक्षांची तस्करी व बेकायदा तोड तसेच झाडांना आगी लावून वणवा पेटवण्याचे प्रकार थांबविण्याच्या अनुषंगाने वन विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यात कसारा, विहीगाव, वाशाळा, खर्डी वन परिक्षेत्रातील विहीरीचा पाडा, आंब्याचा पाडा, शिरोळ, उबरमाळी, मोखावणे, राड्याचा पाडा, शिवाजी नगर आणि

कासार वन क्षेत्रामध्ये पार्टीसाठी येणाऱ्या लोकांकडून आग लावण्याच्या घटना घडलेल्या नसल्याने जंगल उध्वस्त झालेले नाही. तसेच सदर ठिकाणी तस्कराकडून बेकायदा वृक्षतोड झालेली नाही. तथापि, वाशाळा,विहीगाव व खर्डी या तीन वनपरिक्षेत्रांमध्ये मागील १ वर्षात ४९८ वृक्षांची अवैध तोड झालेली असून रु.१,७३,५४५/- नुकसानी झालेली आहे तसेच रु.१,५०,३१९/- चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

(३) वृक्षतोड तस्करींना आळा घालण्यासाठी नियमित गस्त व नाकाबंदी केली जाते. वनक्षेत्रातील रस्त्याच्या दुतर्फा प्रतिबंधात्मक जाळरेषा घेण्यात येतात. हॅलो फॉरेस्ट १९२६ टोल फ्री सेवा कार्यान्वित आहे. आगीबाबत जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येतात. वन विभागात आग विझविणेकामी वनपरिक्षेत्रांना आग प्रतिबंधक साहित्याचा पुरवठा करण्यात आला आहे. आग विझविण्यासाठी वनपरिक्षेत्रात वनवणवा प्रतिबंधक पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. वनकर्मचारी वनवणवा लागल्याचे निदर्शनास येताच तो तात्काळ विझविण्याकामी त्वरीत पोहोचण्याचा प्रयत्न करतात व ग्रामस्थांच्या सहकार्याने वनवणवा आटोक्यात आणतात व गुन्हा दाखल करुन तातडीने कारवाई केली जाते. जंगलगस्त, रात्रीची गस्त करण्यात येते. आग लावणारे वृक्षतोड व तस्करी करणारे आढळल्यास तात्काळ त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाते.

मुंबईतील शिवडी बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकासबाबत

(२७) ३९२४७ (१०-०४-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी, मुंबई येथील मुंबई पोर्टट्रस्टच्या मालकीच्या भुखंडावर असलेल्या जुन्या व मोडकळीस आलेल्या सर्व बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करण्यात यावा अशी मागणी चाळीतील रहिवाशी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केल्यानंतर पोर्टट्रस्टच्या मालकीचा भूखंड बीडीडी चाळीच्या पुनर्विकासासाठी मिळण्याचा प्रस्ताव बीपीटी प्रशासन व केंद्र शासनाकडे शासनाने व म्हाडाने पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत केंद्राने राज्य शासन व म्हाडाला काय निर्णय कळविला आहे,

(३) अद्याप प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने कांहीच कळविले नसल्यास, राज्य शासनाकडून याबाबत उक्त प्रस्तावास मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१५-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाने राज्य शासन/म्हाडास अद्याप त्यांचा निर्णय कळविलेला नाही.

(३) व (४) शिवडी येथील बी. डी. डी. चाळी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर असल्याने सदर चाळींचा पुनर्विकास प्रक्रियेत समावेश करण्यासाठी प्रथम केंद्र शासनाची परवानगी मिळणे तसेच शिवडी बी. डी. डी. चाळीची जागा राज्य शासनाच्या नावे होणे आवश्यक आहे. यानुषंगाने शिवडी येथील बी. डी. डी. चाळींची जमीन राज्य शासनास हस्तांतरीत करण्याकरीता केंद्र शासनास दि .२७.१.२०१७ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये विनंती करण्यात आली .

शिवडी बी. डी. डी. चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करून तो मुंबई बंदर न्यासास दि .१६.०२.२०१८ रोजी पाठविण्यात आला आहे . राज्य शासनाने देखील दि . १९.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदरहू सुसाध्यता अहवाल केंद्र शासनास पाठविला आहे .

शिवडी बी. डी. डी. चाळीच्या पुनर्विकासाबाबत मंत्री (गृहनिर्माण) यांच्याकडे दि .१३.७.२०२१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती .सदरहू बैठकीत असे ठरले की , श्री . अरविंद सावंत, मा . लोकसभा सदस्य यांनी सदरहू विषयासंदर्भात त्वरीत निर्णय होण्याच्या दृष्टाने केंद्र शासनाच्या जहाज मंत्रालयाकडे सर्वसंबंधितांची बैठक आयोजित करण्याबाबत पुढाकार घ्यावा तसेच शिवडी येथील बी. डी. डी. चाळीखालील मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीच्या जागेचा भाडेपट्ट्याचा कालावधी संपुष्टात येत असल्याने उक्त कालावधी वाढविण्यासंदर्भात गृहनिर्माण विभागाने प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांच्या स्तरावरून अध्यक्ष , मुंबई बंदर न्यास यांना पत्र पाठवावे .

त्यानुसार दि . ०५.०८.२०२१ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये शिवडी येथील बी. डी. डी. चाळ प्रकल्पास केंद्र शासनाची मंजुरी मिळविणे तसेच शिवडी बी. डी. डी. चाळीची जमीन राज्य शासनास पुनर्विकासाकरीता हस्तांतरीत करणे याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याची विनंती मुंबई बंदर न्यास यांना करण्यात आली आहे.

शिवडी बी.डी.डी चाळ प्रकल्पास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर व त्याबाबत मुंबई बंदर न्यासाने राज्य शासनास/म्हाडास सूचित केल्यानंतरच सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणे राज्य शासनास शक्य होणार आहे.

वैनगंगा पूलावरील कारधा टोल (जिल्हा भंडारा) नाक्यावर होत असणाऱ्या अवैध टोल वसूलीबाबत

(२८) ३९३४१ (१०-०४-२०२२). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय

रहांगडाले (तिरोडा), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा पुलावरील कारधा टोल प्लाझा वर लहान चारचाकी वाहनांना टोलमुक्त करण्यात आलेले असतांना देखिल टोल प्लाझा वरील कर्मचारी लहान वाहनांना हात दाखवून गाडी थांबवून त्यांच्याकडून अवैध पद्धतीने टोल वसूली करत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात येऊन, टोलमुक्त असलेल्या वाहनांकडून टोल घेणे एक प्रकारची अवैध वसूली असून टोल घेणाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

भंडारा जिल्हयातील नागपूर – रायपूर राष्ट्रीय महामार्ग क्र.५३(६) वरील वैनगंगा नदीवर मोठया पूलाचे बांधकाम बांधा-वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर करण्यांत आलेले असून कारधा टोल प्लाझावर भारत राजपत्र,रस्ते वाहतूक महामार्ग मंत्रालय,नवी दिल्ली अधिसूचना दि.३०.०६.२०२० नुसार टोल वसूली करण्यात येत आहे. सदर अधिसूचनेनुसार लहान चार चाकी वाहनांना टोल मुक्त करण्यात आलेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वनविभागातील वनपरिक्षेत्राधिकारी पदाच्या पदोन्नती प्रलंबित असल्याबाबत

(२९) ३९३५५ (२८-०३-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वनविभागात सरळसेवेतील १३४ वनपालांना वनपरिक्षेत्राधिकारीपदी पदोन्नती प्रलंबित असल्याचे, माहे जानेवारी, २०२२ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथून वन विभागात वनपालांच्या पदोन्नतीसंदर्भात माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान विभागीय पदोन्नतीसमितीची बैठक झाली व तद्नंतर वनपालांच्या पदोन्नतीची यादी माहे सप्टेंबरमध्ये मंत्रालयात पाठविण्यात आली असूनइ त्यावर कोणताच निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पदोन्नती प्रलंबित का आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, तातडीने या पदोन्नतीस मान्यता देऊन १३४ वनपालांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (१४-०६-२०२२) :(१), (२), (३) व (४) वनक्षेत्रपाल, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा कोटयातून भरण्यासाठी वनपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना तदर्थ पदोन्नती देण्याकरीता दिनांक ३०.८.२०२१ रोजी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), नागपूर यांचेस्तरावर पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली होती.

पदोन्नती समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग तसेच शासन मान्यता घेऊन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), नागपूर यांनी या कर्मचाऱ्यांना महसूल विभाग वाटप करुन दिनांक ०४.०५.२०२२ च्या आदेशान्वये या कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित केलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

उन्हाळे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील शहरालगतच्या मुंबई -गोवा महामार्ग चौपदरीकरणाच्या कामामुळे कणेरीवाडी येथील काजू कलमांचे नुकसान झाल्याबाबत

(३०) ३९३७८ (१९-०४-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उन्हाळे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील शहरालगतच्या मुंबई -गोवा महामार्ग चौपदरीकरणाच्या कामामुळे कणेरीवाडी येथील श्री. सुहास शंकर परवडे यांच्या काजू कलमांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौपदरीकरणाचे काम करणा-या ठेकेदाराने कंपनीला वारंवार विनंती करुनही कोणतीही दखल अदयाप घेण्यात आलेली नसल्याने त्यांनी प्रजासत्ताक दिवशी म्हणजेच दिनांक २६ जानेवारी, २०२२ रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मालकीच्या जमिनीत बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन मोठया प्रमाणात मातीचा भराव टाकल्यामुळे काजूच्या बागेचेही नुकसान झाले असून सदर कंत्राटदाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे बागेतील अनेक काजूची झाडे गाडली व वाहूनही गेली आहेत तसेच अतिवृष्टीमुळे रस्त्यावरुन येणारे पाणी थेट शेतजमिनीत येत असल्यामुळे सुपीक मातीचा थर वाहून जावून संपूर्ण जमीन नापीक झाली असल्याप्रकरणी श्री.सुहास शंकर परवडे यांनी प्रांताधिकारी यांना निवेदन देऊन सदर बाब निदर्शनास आणूनही अदयाप याबाबत दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने शासनस्तरावर तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०६-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
श्री.सुहास शंकर परवडे यांच्या काजु कलमांचे बागेत मागील वर्षाच्या अतिवृष्टीमुळे रस्त्याचा भराव वाहून गेल्याने काही झाडांचे नुकसान झाले असण्याची शक्यता आहे.
(२) श्री.सुहास शंकर परवडे यांच्या काजू कलमांच्या बागेत वाहून गेलेल्या भरावाचा भाग काढण्याचे काम चौपदरीकरणाच्या ठेकेदार कंपनीकडून सुरु केल्यामुळे दि. २६ जानेवारी,२०२२ रोजी उपोषण न करण्याबाबत त्यांना विनंती करण्यात आली. सदयस्थितीत सदर काम ठेकेदाराकडून पूर्ण करण्यात आले आहे.
(३) व (४) सदरच्या ठिकाणी महामार्गाच्या अस्तित्वातील शासन संपादित जमिनीमध्ये काम करण्यात आले आहे. तथापी महामार्गाच्या कामाचा भराव अतिवृष्टीमुळे लगतच्या श्री.परवडे यांच्या जमिनीमध्ये वाहून गेल्याने सदर ठिकाणच्या नुकसानीबाबत श्री.सुहास परवडे, उप विभागीय अधिकारी, राजापूर; कृषी अधिकारी व स्थानिक शेतकरी यांच्या समवेत संयुक्त पाहणी करण्यात आली आहे व त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी, राजापूर यांचेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील अभ्युदयनगर, काळाचौकी येथील जय हनुमान को-ऑप.हौ.सोसायटीच्या पुनर्विकास लेआऊटबाबत

(३१) ३९६२८ (१८-०४-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई-३३ येथील “जय हनुमान को-ऑप.हौ.सोसायटीच्या” इमारत क्र.६ च्या पुनर्विकासाबाबत म्हाडा प्राधिकरणाने विकासकास अद्याप पैसे न दिल्याने विकासक मे.लेले ॲण्ड असोसिएट याने पुनर्विकासाबाबतचा लेआऊट अद्याप म्हाडाला सादर केलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, “जय हनुमान को-ऑप.हौ.सोसायटीच्या” इमारत क्र.६ च्या पुनर्विकासाबाबत विकासकास म्हाडाने पैसे न देण्याची कारणे काय असून सदर इमारतीचा पुनर्विकासाबाबतचा लेआऊट तयार करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व रहिवाशीनी म्हाडाकडे वारंवार पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ. जितेंद्र आव्हाड (०३-०६-२०२२) :(१), (२) व (३) अभ्युदयनगर, काळाचौकी , मुंबई येथील जय हनुमान को-ऑप. हौ. सोसायटीच्या इमारत क्र.६ च्या पुनर्विकासाचा प्रस्ताव संस्थेमार्फत अद्यापही म्हाडाच्या, मुंबई मंडळाकडे सादर करण्यात आलेला नाही. तसेच विकासकाला पैसे देण्याची बाब म्हाडाशी संबंधित नाही.

अभ्युदय नगर काळाचौकी या म्हाडा वसाहतीचा अभिन्यास तयार करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व रहिवाशांनी म्हाडाकडे मागणी केली आहे.

अभ्युदयनगर , काळाचौकी या म्हाडा वसाहतीचा अभिन्यास सुधारित वि.नि.नि. ३३(५) अंतर्गत नकाशे तयार करणे व मंजुरी प्राप्त करण्यासाठी मुंबई मंडळाच्या पॅनलवरील मे. लेले ॲन्ड असोसिएट यांची समंत्रक वास्तुशास्त्रज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मे. लेले ॲन्ड असोसिएट यांना अभिन्यास नकाशे तयार करण्यासाठी भागश: व्यावसायिक शुल्क मुंबई मंडळामार्फत अदा करण्यात आले असून उर्वरित शुल्क करारनाम्यातील टप्प्यानुसार अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

विकास आराखडा २०३४ नुसार सदरहू अभिन्यासास ३.०० च.क्षे.नि. दि.२८/१/२०२२ रोजी मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी तालुका हद्दीतून जाणाऱ्या कल्याण-निर्मळ (विशाखापट्टणम) राष्ट्रीय महामार्ग रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(३२) ३९६८२ (१९-०४-२०२२). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी तालुका हद्दीतून जाणाऱ्या कल्याण-निर्मळ (विशाखापट्टणम) राष्ट्रीय महामार्ग क्र.जुना २२२ (नवा क्र.६१) रस्त्याचे काम सुमारे ६ वर्षापासून अपूर्णावस्थेत असून खड्डेमय झाल्यामुळे ५४ अपघात होवून १०४ लोकांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ पासून पाथर्डी तालुका भुतेटाकळी ते नगर रस्त्याचे काम खोदकाम, पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याने व खड्डे पडल्यामुळे वाहतूकीसाठी धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०६-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रकल्पाच्या मंजूर ५१.७५ कि.मी. लांबी पैकी सुमारे ४२.५० कि.मी.मध्ये नवीन डांबरीकरणाचे काम करण्यात आले आहे व उर्वरित लांबीमध्ये भूसंपादनाच्या कारणास्तव तसेच कामाच्या वावातील बदलामुळे काम पूर्ण होऊ न शकल्याने अस्तित्वातील डांबरी रस्ता खराब झाला आहे. तसेच पाथर्डी शहरानजीक नवीन पूलाचे काम सद्यस्थितीत प्रगतीत आहे.

(३) सदयस्थितीत बाधीत लांबीतील भूसंपादन प्रक्रिया अंतिम टप्प्यातआहे. तसेच कामाच्या वावातील बदलास मंजुरी प्राप्त करुन घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार सदर काम लवकरच हाती घेवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तथापी दरम्यानच्या कालावधीत सदर रस्ता वाहतुकीयोग्य ठेवणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चाळीसगाव (जि.जळगांव) शहरातील नवीन मध्यवर्ती मुख्य प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत

(३३) ३९६९३ (१९-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगांव) शहरातील भूमी अभिलेख कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, आदी कार्यालये खाजगी इमारतीत कार्यरत आहेत, तसेच तहसील व प्रांत कार्यालये हि अतिशय छोट्या जागेत कार्यरत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाळीसगाव तालुक्यात सुसज्ज अशी मध्यवर्ती मुख्य प्रशासकीय इमारत बांधणे अत्यंत आवश्यक असून नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी रुपये १४ कोटी ७६ लक्ष रुपयांचा प्रस्ताव प्रधान सचिव समिती, यांच्याकडे दि.६/७/२०१६ रोजी पासून शासन स्तरावर प्रलंबित आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्याकडून प्रशासकीय इमारत बांधकामाबाबतचा रु.१४.९६ कोटी किमतीचा प्रस्ताव दि.१८.०३.२०२० रोजी महसूल विभागास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने एकाच ठिकाणी सर्व शासकीय कार्यालयाचे कामकाज सुरू होऊन नागरिकांची गैरसोय दूर होईल यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०७-०६-२०२२) : (१) होय, अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) चाळीसगांव जि.जळगांव येथे मुख्य प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे या कामाच्या रु.१४.६७ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास दि.०५ मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर काम सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रु.७२.९७ लक्ष इतकी तरतुद करण्यात आली.

मुंबईतील नायगाव येथे बीडीडी चाळीचा पुनर्विकास प्रकल्पाबाबत

(३४) ३९७७३ (१९-०४-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायगाव येथे बीडीडी चाळीचा पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाची सुरुवात दिनांक ४ जानेवारी, २०२२ पासून करण्यांत आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात झाली असून चाळ कुर.५ब, ८ब व २२ब या चाळी पाडण्याचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चाळीत राहणाऱ्या रहिवाश्यांची वास्तव्याची सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात येत आहे आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१५-०६-२०२२) : (१) हे खरे आहे .
(२) चाळ क्र .५ ब, ८ब संपूर्ण रिक्त झाली असून त्यापैकी चाळ क्र .५ ब तोडण्यात आली आहे . चाळ क्र .८ ब चे दरवाजे व खिडक्या काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे. चाळ क्र .२२ ब मधील ६४ गाळयांपैकी के. ई. एम. विभागाचे १५ सेवानिवासस्थान गाळे रिक्त करण्यात आले असून उर्वरीत ४९ गाळे अद्यापही रिक्त झालेले नाहीत . त्यामुळे चाळ क्र .२२ ब संपूर्ण रिक्त झाल्यानंतरच तेथे पाडकाम करणे शक्य होईल .
(३) व (४) के. ई. एम. विभागाच्या १७५ सेवानिवासस्थान गाळयांमधील रहिवाश्यांना बॉम्बे डाईंग, नायगाव येथील संक्रमण शिबिरातील इमारतींमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे .

भोकरदन (जि.जालना) येथील सार्वजनिक स्वच्छतागृहाची झालेली दुरवस्था

(३५) ३९९८८ (०७-०३-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरदन (जि.जालना) येथील सार्वजनिक स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगरपरिषदेने आठवडी बाजार, बाबू जगजीवनराम नगर, समता नगर, मल्ली परिसर या भागात लाखो रुपये खर्च करुन सार्वजनिक शौचालये बांधलेली आहेत परंतु सदर शौचालयाची देखभाल व साफसफाई होत नसल्याने त्यात दुर्गंधी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शौचालयांची साफसफाई करुन वापरासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२२) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

भोकरदन शहरातील आठवडी बाजार, बाबू जगजीवनराम नगर, समता नगर व मल्ली परिसर या भागातील सार्वजनिक शौचालये सन १९९५-९६ मध्ये बांधण्यात आली असून, याकरीता अंदाजित रु.१५.०० लाख खर्च झाला आहे. सदर सार्वजनिक शौचालयांची देखभाल व साफसफाई नगरपरिषदेमार्फत वेळोवेळी करण्यात येते. तसेच दुर्गंधीनाशक औषधांची फवारणी करण्यात येते.
(३) सद्यस्थितीत सदर शौचालये वेळोवेळी साफसफाई करुन नागरिकांकरीता नियमित वापरासाठी उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

अमरावती जिल्हयातील अमरावती-दर्यापूर, दर्यापूर-अंजनगाव सुर्जी या रस्त्यांची रुंदी वाढविण्याबाबत

(३६) ४००८३ (१९-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील अमरावती-वलगाव-दर्यापूर आणि दर्यापूर- अंजनगाव या राज्य मार्गाचे काम हायब्रिड एन्युईटी अंतर्गत झालेले असून दोन्ही रस्ते अरुंद असल्याने या मार्गावर मोठ्या प्रमाणात अपघाताचे प्रमाण वाढलेले असून या दोन्ही रस्त्यांची रुंदी वाढवण्याची मागणी सामान्य नागरीकांकडून होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास सदर रस्त्यांची रुंदी वाढवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोकराव चव्हाण (०७-०६-२०२२) : (१) अमरावती-वलगांव-दर्यापूर रामा-४७ आणि दर्यापूर-अंजनगांव रामा-२८२ या दोन्ही रस्त्यांची सुधारणा हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत झालेली असून अस्तित्वातील ५.५० मी रुंद धावपट्टीचे ७.०० मी रुंदीत रुंदीकरण करण्यात आलेले आहे तसेच रस्ता सुरक्षीततेच्या दृष्टीने आवश्यक असणा-या सर्व बाबी मानकाप्रमाणे कार्यान्वित केलेल्या आहेत.

अमरावती-वलगांव-दर्यापूर रामा-४७ रस्त्याची रुंदी ७.०० मी. वरुन १०.०० मी. करण्याची मागणी दि. २१/१२/२०२१ व दि. २७/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त आहे.
(२) सदर रस्त्याची पुढील १५ वर्षाची वाहतुक वर्दळ लक्षात घेता ५.५० मी. धावपट्टीचे ७.०० मी. धावपट्टीसाठी (२x२.५ मी. रुंद स्कंधासह) नुकतेच रुंदीकरण झालेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जोगेश्वरी (मुंबई) येथील हरिनगर, शिवाजी नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(३७) ४०१३५ (१८-०४-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) येथील हरिनगर, शिवाजी नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पास सन १९९३ मध्ये वा त्या दरम्यान सुरूवात होवून त्यावेळी या प्रकल्पात एकूण ९७४ पात्र झोपडपट्टीधारकांची नावे परिशिष्ट-२ च्या यादीत असताना, विकासकाने शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून या यादीत बनावट झोपडीधारकांची नावे दाखल करुन सद्य:स्थितीत या प्रकल्पाच्या परिशिष्ट-२ च्या यादीत १५६२ झोपडीधारकांची नावे दर्शविण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासक या प्रकल्पातील सदनिकांची खाजगी व्यक्तींना अनधिकृतरित्या विक्री करीत असून सदरहू बाब निदर्शनास आल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून सदरहू प्रकरणी या प्रकल्पातील तयार झालेल्या जवळपास ३०० सदनिकांमध्ये अनधिकृतरित्या वास्तव्य करीत असलेल्या रहिवाशांविरूध्द महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व प.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३३ व ३ (ई) नुसार निष्कासनाची कारवाई उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेमार्फत सुरू आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या सुरूवातीस या ठिकाणी केवळ ८ ते १० व्यावसायिक गाळे असताना विकासकाने या ठिकाणी ३० पेक्षा अधिक गाळे तयार करून त्याची खाजगी विक्री करून कोटयवधी रूपयांचा नफा मिळविला असून मूळ गाळेधारक मात्र त्यांच्या हक्काच्या गाळयापासून सद्य:स्थितीत वंचित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्पात बांधण्यात आलेल्या इमारतींच्या मालमत्ता कराचा विकासकाने अद्याप बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे भरणा न केल्याने सदरहू इमारतींना अधिकृत पाणी पुरवठा करण्यात येत नसून ड्रेनेज लाईन उघडयावर सोडण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गेल्या २५ वर्षांपासून आपल्या हक्काच्या सदनिकांपासून वंचित असणाऱ्या या प्रकल्पातील पात्र झोपडीधारकांना गेल्या ४ ते ५ वर्षांपासून विकासकाने भाडे देणेही बंद केल्याची बाब निदर्शनास आली आहे तसेच सदरहू प्रकल्प अद्याप पूर्ण झालेला नसतानाही या प्रकल्पामुळे विकासकास प्राप्त झालेल्या जवळपास ३४,००० चौ.फू. चटई क्षेत्र निर्देशांकाचा विकासकाने अंधेरी (मुंबई) येथील स्वत:च्या खाजगी व्यावसायिक प्रकल्पांकरिता बेकायदेशीररित्या वापर केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी व पात्र झोपडीधारकांनी या प्रकरणी वारंवार पाठपुरावा करून देखील मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेसोबत १० पेक्षा अधिकवेळा बैठका होवूनही संबंधित घुसघोरांना सदनिकांमधून निष्कासित करण्याचे केवळ आश्वासन देण्यात येते परंतु प्रत्यक्षात कार्यवाही मात्र होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या प्रकरणी वारंवार होत असलेल्या राजकीय हस्तक्षेपामुळे तसेच विकासकाच्या आडमुठे धोरणामुळे या प्रकल्पातील मूळ पात्र झोपडीधारक त्यांच्या हक्काच्या घरांपासून वंचित असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करून या प्रकल्पातील घुसखोरांवर निष्कासनाची कारवाई करून त्यांचेवर फौजदारी कारवाई करून गुन्हे नोंदविण्याबाबत तसेच पात्र झोपडीधारकांना गत ४ ते ५ वर्षांपासून प्रलंबित असलेले भाडे व्याजासहित देवून त्यांना हक्काची सदनिका उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत व सदरहू कार्यवाही किती कालावधीत करण्यात येणार आहे,

(८) तसेच सदरहू प्रकरणी तातडीने कार्यवाही करून संबंधित विकासकास काळया यादीत टाकून पात्र झोपडीधारकांना प्रलंबित असलेले घरभाडे व हक्काची घरे किती कालावधीत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-०६-२०२२) : (१) हरीनगर शिवाजीनगर सहकारी गृहनिर्माण संस्था (नि.) या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता सहायक आयुक्त, (के/पूर्व) विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून ९७४ झोपडीधारकांचे मूळ परिशिष्ट-२ व ५८८ झोपडीधारकांचे पुरवणी परिशिष्ट-२ असे एकूण १५६२ झोपडीधारकांचे परिशिष्ट-२ निर्गमित करण्यात आलेले आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३३ नुसार झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाकडून १२२ अनधिकृत

व्यक्तींवर निष्कासनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यानुसार ११९ सदनिकाधारकांची सुनावणी घेऊन दि. १८.११.२०२१ रोजी अंतिम आदेश पारित करण्यात आले आहेत. त्यानुसार अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या सदनिकाधारकांना ७ दिवसांत सदनिका रिक्त करण्याबाबत नोटीस निर्गमित करण्यात आली आहे. निष्कासन कारवाईच्या पहिल्या टप्प्यामध्ये ११९ सदनिकाधारकांपैकी परिशिष्ट-२ समाविष्ट नसलेले व परिशिष्ट-२ मध्ये अपात्र असलेले असे एकूण ७१ सदनिकाधारकांना दि.१.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये ४८ तासांची नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) सदर संस्थेच्या मूळ परिशिष्ट-२ व पुरवणी परिशिष्ट-२ नुसार एकूण ८२ अनिवासी झोपडया आहेत. त्यापैकी ३३ पात्र व ४९ अपात्र झोपडया आहेत. सदर प्रकरणात दि. २१.८.२०२० रोजी दिलेल्या सुधारित आशयपत्रानुसार एकूण ३४ व्यवसायिक गाळयांची तरतूद करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकल्पासाठी त्वरीत अधिकृत पाणी पुरवठा करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिलेल्या मान्यतेनुसार ड्रेनेज लाईन पूर्ववत करुन देण्याबाबत विकासकास कळविण्यात आले आहे.

(५) सदर प्रकल्पात पात्र झोपडीधारकांना भाडे न दिल्यामुळे विकासकाच्या विक्री घटकास काम थांबवा नोटीस देण्यात आली आहे. विकासकास प्राप्त झालेला चटईक्षेत्र निर्देशांक विकासकाने त्यांच्या खाजगी व्यवसायिक प्रकल्पाकरिता बेकायदेशिररित्या वापरलेली आहे, ही बाब खरी नाही. सदर प्रकल्पात निर्माण झालेल्या विक्री घटक बांधिल क्षेत्र अंधेरी येथील साईवाडी एस.आर.ए. गृहनिर्माण संस्था येथे एकत्रित केलेल्या योजनेमध्ये हस्तांतरीत केलेले आहे. सदरहू बांधकामास नियमानुसार मंजूरी देण्यात येत आहे.

(६) प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३३ नुसार झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाकडून १२२ अनधिकृत व्यक्तींवर निष्कासनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यानुसार ११९ सदनिकाधारकांची सुनावणी घेऊन दि. १८.११.२०२१ रोजी अंतिम आदेश पारित करण्यात आले आहेत. त्यानुसार अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या सदनिकाधारकांना ७ दिवसांत सदनिका रिक्त करण्याबाबत नोटीस निर्गमित करण्यात आली आहे. निष्कासन कारवाईच्या पहिल्या टप्प्यामध्ये ११९ सदनिकाधारकांपैकी परिशिष्ट-२ समाविष्ट नसलेले व परिशिष्ट-२ मध्ये अपात्र असलेले असे एकूण ७१ सदनिकाधारकांना दि.१.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये ४८ तासांची नोटीस बजावण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई विविध झोपडीधारकांनी रिट याचिका दाखल केल्या असल्याने सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(७) व (८) झोपडीधारकांना भाडे देण्याकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून विकासकास आदेशित करण्यात आले आहे. या अनुषंगाने विकासकाचे विक्री घटकातील बांधकामासाठी स्थगिती देण्यात आली आहे. सदर प्रकल्पातील झोपडीधारकांना घरे देण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

राज्यात इतर जंगलासह वन्यजीव विभागातही वणव्याच्या सुमारे १४ हजार घटना घडल्याबाबत.

(३८) ४०३०४ (१८-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गतवर्षात राज्यात इतर जंगलासह वन्यजीव विभागातही वणव्याच्या सुमारे चौदा हजार घटना घडल्या असून वणव्यात सव्वा कोटी रुपयांच्या वनसंपदेचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जाळरेषा तयार करण्यासाठी वेगळा निधी वनखात्याला देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार वणवे लागू नयेत म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०६-२०२२) : (१) गत वर्षात राज्यात आगीच्या एकूण ९८६१ घटना घडल्या असून ३८६५० हे. इतके वनक्षेत्र जळीत झालेले असून त्यामध्ये शासनाचे रु.१२१.७४ लक्ष इतके नुकसान झालेले आहे.

वरील घटनांपैकी वन्यजीव विभागात गत वर्षात एकूण १००६ घटना घडल्या असून ८४२७ हे. इतके क्षेत्र जळीत झालेले असून त्यामध्ये शासनाचे रु.१०.०१ लक्ष इतके नुकसान झालेले आहे.

(२) जाळरेषा व वनवणवा आपत्ती व्यवस्थापन करण्याकरीता केंद्र पुरस्कृत योजना, जिल्हा योजना व योजनेत्तर अशा लेखाशिर्षामधील अनुदान प्राप्त होत असते.

(३) व (४) प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून वनक्षेत्रात जाळरेषा घेण्यात येतात. आग विझविण्यासाठी प्रशिक्षीत अधिकारी/ कर्मचारी वनमजूर यांचे फायर फायटिंग पथक तयार करण्यात येते व त्यांना आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करुन देण्यात येते. वनवणवा निदर्शनास येताच वनगुन्हा नोंदविण्यात येऊन प्रकरणाची चौकशी करण्यात येते. आगीपासून वनांचे संरक्षण करण्यासाठी विभागीय स्तरावर वनवणवा नियंत्रण कक्ष स्थापन

करण्यात आले आहे. आग नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत असते. आगीबाबत जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येतात. अवैध घटनांची माहिती प्राप्त होण्यासाठी हॅलो फॉरेस्ट १९२६ टोल फ्री सेवा कार्यान्वित आहे.

पोखरी आणि माळहिरवा (जि.यवतमाळ) येथील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(३९) ४०४१६ (१९-०४-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोखरी आणि माळहिरवा (जि.यवतमाळ) येथील दोन गावांना जोडणा-या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने २ कोटी रुपये मंजूर करुन कंत्राटदाराकडून करुन घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंत्राटदाराने रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे नविन रस्ता हातानेही उकरता येत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट दर्जाच्या डांबरीकरणाचे काम करणा-या कंत्राटदारावर व त्याला पाठिशी घालणा-या संबधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अशोकराव चव्हाण (०७-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे. सदर कामास रु. २.५० कोटीची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून, करारनामा किंमत रु. १.८५ कोटी एवढी आहे.

(२) सदर रस्त्याची एकूण लांबी ९.२०० कि.मी. एवढी असून, या लांबी पैकी २००.०० मिटर लांबीमध्ये डांबरीकरणाचे काम कंत्राटदाराने विभागाला कुठलीही पुर्व सुचना न देता व अस्तित्वातील पृष्ठभागावरील साफसफाई न करता केल्यामुळे रस्त्याच्या कडा उखडल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) या प्रकरणी संबंधीत कंत्राटदारास काळया यादीत टाकण्यात आले असून, कंत्राटदाराने खराब काम झालेल्या २०० मिटर लांबीमध्ये गुणवत्ता राखुन परत काम करुन दिले आहे. संबंधित अधिकारी यांना यासंदर्भात दोषारोप पत्रे बजावण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरखेड वनक्षेत्रातील (जि.यवतमाळ) सागवान वृक्षांची होत असलेली अवैध वृक्षतोड

(४०) ४०५६१ (१८-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड वनक्षेत्रातील (जि.यवतमाळ) येथील शेत सर्वे नंबर ३०७ मधील श्री.घनश्याम सटवा गोरे यांच्या शेताला लागूनच असलेल्या शिवेवरील सागवानांची अवैधरित्या तोड केल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्य: स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०६-२०२२) : (१) उमरखेड वनक्षेत्रातील शेत सर्व्हे नंबर ३०७ मधील श्री. धनश्याम स. गोरे यांच्या शेताला लागूनच असलेल्या शिवेवरील सागवानाची अवैधरित्या तोड केल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आली नाही. परंतु. श्री. धनश्याम गोरे यांच्या शेतातील सागवान झाडास तोड करणे करीता वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी उमरखेड यांचे कार्यालयास अर्ज केल्यानुसार त्यांना महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४ नुसार वनोपज निर्गत परवाना जारी करण्यात आला. सदरची वृक्षतोड प्रकरणी शासन अधिसुचना व आदेशान्वये रितसर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२),(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

डोलखांब वन परिक्षेत्रातील साकुली व वेहलोली येथील (ता.शहापूर ,जि.ठाणे) रोपवाटिकेतील रोपे सुकून गेल्याबाबत

(४१) ४०६४७ (१८-०४-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने ९३ कोटी वृक्ष लागवड योजनेचे धोरण अवलंबिले असून त्यापैकी २०१८-२०१९ मध्ये वा त्या दरम्यान १३ कोटी वृक्ष लागवड केली जाणार होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) डोलखांब वनपरिक्षेत्र अंतर्गत साकुली व वेहलोली येथे ‘महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ३ लाख रुपये खर्च करून प्रति हेक्टरी १ हजार १०० रोपांची लागवड याप्रमाणे २० हेक्टर क्षेत्रात २२ हजार रोपवाटिकांची लागवड करण्यात आली होती ,त्यापैकी नदी किनारी असणाऱ्या ४ ते ५ हजार रोपांची वन विभागाने लागवड न केल्याने ही रोपे पाण्याविना सुकून गेली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वनविभागाच्या अक्षम्य दिरंगाईमुळे अनेक मजूर रोजगार हमी योजनेच्या वृक्ष लागवडीच्या कामापासून वंचित या आशयाचे पत्र समर्थन या संस्थेने मृदू व जलसंधारण विभाग, रोजगार हमी योजना व फलोत्पादन या विभागांना दि. ११ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले होते हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शहापूर तालुक्यात रोजगार हमी योजने अंतर्गत वृक्ष लागवडीच्या कामापासून वंचित ठेवणाऱ्या तसेच वृक्ष लागवडीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

शासनाने ९३ कोटी वृक्ष लागवड योजनेचे धोरण अवलंबिले नसून शासनाने ५० कोटी वृक्ष लागवडीचे धोरण अवलंबिले होते. त्यामध्ये सन २०१७-१८ मध्ये ४ कोटी, सन २०१८-१९ मध्ये १३ कोटी व सन २०१९-२० मध्ये ३३ कोटी, असा एकूण ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही. शहापूर तालुक्यातील (जि. ठाणे) डोलखांब वनपरिक्षेत्रांतर्गत साकुर्ली व वेहळोली येथे महाराष्ट्र रोजगार हमी योजना अंतर्गत रोपांची लागवड करण्यात आलेली नसून सदर कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेली आहेत. सन २०१८-१९ मध्ये मग्रारोहयो अंतर्गत रोपवाटीका साकुर्ली व रोपवाटीका वेहळोली येथे तयार करण्यात आलेल्या प्रत्येकी ५० हजार, असे एकूण १ लाख रोपांचा वापर विविध योजनांतर्गत लागवडीसाठी करण्यात आलेला आहे. सबब, नदी किनारी ४ ते ५ हजार रोपांची वनविभागाने लागवड न करता रोपे पाण्यावाचून सुकुन गेली, हे खरे नाही.
(३) हे खरे आहे. उपवनसंरक्षक, शहापूर यांना सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दि.२६.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये समर्थन संस्थेचे पत्र प्राप्त झाले असून त्या अनुषंगाने वनक्षेत्रपाल, डोळखांब यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून, त्यानुसार सदर पत्रामध्ये नमूद तक्रारीत तथ्य नसल्याबाबत अहवाल उपवनसंरक्षक, शहापूर वनविभाग यांचेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या कार्यालयास दि.१६.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे.

(४) व (५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवडीच्या कामांपासून कोणासही वंचीत ठेवले नसल्याने याबाबत प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील लोकसेवा आयोगामार्फत राबविण्यात येणारी अर्ज प्रक्रिया स्थगित करण्यात आल्याबाबत.

(४२) ४०८०५ (१८-०४-२०२२). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भरतीप्रक्रियेत वारंवार होणाऱ्या दिरंगाईनंतर आता संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणींमुळे उमेदवारांना समस्यांचा सामना करावा लागत असून आयोगालाही अर्जांच्या तारखांमध्ये वारंवार बदल करावा लागत असल्याने अखेर अर्ज भरण्याची प्रक्रिया स्थगित करण्याची नामुष्की MPSC वर ओढवली असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, MPSC च्या संयुक्त गट – क परीक्षेसाठी अर्ज भरणे सुरु असताना आयोगाने सुरुवातीला दिनांक ११ जानेवारी, २०२२ ही मुदत दिली होती परंतु, त्यात पुन्हा दिनांक १५ जानेवारी, २०२२ पर्यंत वाढ करण्यात आली मात्र त्यानंतरही MPSC च्या संकेतस्थळावर गोंधळ निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, MPSC कडून सातत्याने होत असलेल्या गोंधळामुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे तसेच आयोगाच्या संकेतस्थळाचे कंत्राट हे एका खासगी कंपनीला दिले असून सदर कंपनी आपले काम त्रयस्थ संस्थेकडून करत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नव्याने आलेल्या कंपनीला संकेतस्थळ सांभाळण्यास अडचणी येत असल्यामुळे याबाबत शासनाने चौकशी करुन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (०७-०६-२०२२) :(१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची ऑनलाईन अर्जप्रणाली नव्याने विकसित करण्यात आली असून सुरुवातीला उमेदवारांना अर्ज करताना अडचणी उद्भवल्या आहेत. अडचणींचे निराकरण करण्याकरीता आयोगाची ऑनलाईन अर्जप्रणाली फेब्रुवारी, २०२२ मध्ये काही दिवसांकरीता स्थगित करण्यात आली होती.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२१ करीता प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यास उमेदवारांना अडचणी येत होत्या त्यामुळे दि. १५ जानेवारी, २०२२ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती. सदर मुदत वाढ देण्यात आल्यानंतरही उमेदवारांना अर्ज सादर करण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आल्याने तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी आयोगाची ऑनलाईन प्रणाली काही दिवसांकरीता स्थगित करण्यात आली होती.

(३) व (४) ऑनलाईन अर्जप्रणाली विकसित करण्यासाठी आयोगाने नियुक्त केलेली सेवा पुरवठादार संस्था अन्य कोणत्याही त्रयस्थ संस्थेकडून काम करुन घेत नाही.

सदर संस्थेच्या सेवेत काही प्रमाणत त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव क्लाऊड सेवा पुरवठादार संस्था बदलण्याची कार्यवाही आयोगाकडून सुरु आहे.

सद्य:स्थितीत सर्व तांत्रिक अडचणींचे निराकरण झाले असून उमेदवारांनाही संकेत स्थळाचा वापर करण्यास सुलभता आली आहे.

ठाणे जिल्ह्यातील वडपे बायपास- कसारा या रस्त्याची पावसाळ्यात अत्यंत दुरवस्था झाल्याबाबत

(४३) ४१०३६ (१८-०४-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील वडपे बायपास-कसारा या रस्त्याची गत पावसाळ्यात अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते, तसेच रस्त्यावरील खड्डे भरलेले आहेत तथापि सदर रस्ता सिमेंटचा बनविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही असून सदर रस्त्याच्या कामास केव्हापर्यंत सुरुवात होणे अपेक्षित आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अशोकराव चव्हाण (०६-०६-२०२२) : (१) वडपे बायपास ते कसारा हा रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येतो.

सदर रस्त्यावर गेल्या पावसाळयात खड्डे पडले होते, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

(२) खड्डे त्वरीत भरण्यात आले असून सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे.

तसेच सदर रस्ता सिमेंटचा बनविण्याकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याची कार्यवाही सुरु असून प्रकल्प सल्लागाराकडून प्राधिकरणास सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबतची पुढील कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

तथापि, नेहमीच खराब होणा-या भागात Soil Stabilization ने मजबुतीकरण करण्यात आले असल्याचे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,नाशिक यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासीसाठी राखीव असलेली १२५०० पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम राबविण्याबाबत

(४४) ४१४१० (२८-०३-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली गठीत अभ्यास गटाकडून अद्यापही शासनाकडे शिफारसी अप्राप्त असल्यामुळे आदिवासीसाठी राखीव असलेली १२५०० पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम राबविण्याबाबत बल्लारपूर येथील स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०६-२०२२) : (१)होय,(२) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१६-ब) दि. २१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचा-यांना अधिसंख्य पदावर वर्ग करुन सदर रिक्त झालेली पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारामधून कालबदध कार्यक्रम राबवून भरण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर भरती प्रक्रिया पूर्ण क्षमतेने राबविण्याबाबतच्या सूचना दि. १५.४.२०२१ , दि. ३०.७.२०२१ व दि. २४.१२.२०२१ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार अनुसूचित उमेदवारांमधून रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा ते यवतमाळ, नेर राज्य मार्गावर हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत रस्त्याचे कामात तांत्रिक मापदंड न पाळल्याने रस्त्याचे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याबाबत

(४५) ४१७६३ (१०-०४-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात दारव्हा ते यवतमाळ, नेर आणि कुपटा हा राज्य मार्ग हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत मंजुर असून बांधकाम खात्याच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राज्य मार्गाचे काम अनेक महिन्यांपासून सुरु असून काम करतांना रात्रंदिवस चालणाऱ्या वाहतुकीचा विचार न करता अनेक ठिकाणी पूर्ण रस्ता खोदण्यात आला असून पुलांच्या वळण रस्त्यांचे पक्के बांधकाम करण्यात आले नसून काही अंतरावरील बांधकामानंतर मध्येच खड्डे ठेवण्यात आल्यामुळे तसेच रस्त्याच्या बाजूला खोदलेल्या नाल्यामुळे वळण रस्त्यावरील पुलाच्या पाण्यामुळे शेती पिकांचे प्रचंड नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर राज्य मार्गावर उखडलेले रस्ते व खड्यांमुळे यवतमाळ मार्गावर मोठया प्रमाणात अपघात होत असून काही दिवसांपूर्वी लाडखेड येथील एका महिलेला आपला जीव गमवावा लागला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे (०७-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

यवतमाळ ते दारव्हा, दारव्हा ते नेर, व दारव्हा ते कुपटा रस्त्याचे काम हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर असुन सदर काम सा. बां. विभागामार्फत करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

पुलाचे बांधकाम व पोचमार्गाचे बांधकाम पुर्ण झालेले असुन पोचमार्गाचे डांबरीकरण प्रगतीत आहे. वळण रस्ते काढुन टाकण्यात आलेले असुन पुलावरुन वाहतुक सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

दि. २४/०५/२०२१ रोजी बोरी गावाजवळ वाहन चालकाने भरधाव वेग व निष्काळजीपणाने वाहन चालविल्याने अपघात झाल्याची लाडखेड पोलिस ठाण्यातील

F.I.R. मध्ये नोंद आहे. उपचारादरम्यान सह प्रवाशी याचा मृत्यु झाला.
(४) सदर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे व मे-२०२२ अखेर पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे. सदर रस्त्यावरील देखभाल व दुरुस्तीची कामे संबंधीत उद्योजकामार्फत वेळोवेळी करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कांदिवली (पूर्व) मुंबई या वनविभागाच्या अखत्यारित येत असलेल्या भूखंडाला देण्यात आलेल्या परवानग्या रद्द करण्याबाबत

(४६) ४३४६७ (३०-०३-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुंडेजा कस्टमंडू सिटीएस क्र. ८७४/क/८ पोईसर गाव, कांदिवली (पूर्व) मुंबई या वनविभागाच्या अखत्यारित येत असलेल्या भूखंडाला देण्यात आलेल्या आयओडी, सीसी, ओसी आणि अन्य सर्व परवानग्या रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.वने राज्यमंत्री, यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०६-२०२२) :(१) होय हे खरे आहे.
(२) बांधकाम प्रकल्पास आय. ओ. डी., सी.सी., ओ.सी. देण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित आहे. तथापि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अधिसूचीत इको सेन्सीटीव्ह झोनमधील मे. काष्टमांडुप डेव्हलपर्स प्रा. लि. यांचे मौजे पोईसर, सर्वे क्र. ८७४/क/८ मधील गुंडेचा ग्रीन्स या प्रकल्पास सदर प्रकल्पाकरीता राज्य वन्यजीव व राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त होईपर्यत आय. ओ. डी., सी.सी., ओ.सी. इत्यादी परवानग्या देण्यात येऊ नयेत व यापूर्वी देण्यात आलेल्या तत्सम परवान्या स्थगित ठेवण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागास क्षेत्रिय स्तरावरुन कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

जळगाव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रकल्पाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

(४७) ४३५८० (२५-०४-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रकल्पाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असून शहरातून निघणारा लाखो टन कचरा शिवारात टाकला जातो मात्र त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून निघणारा धूर व दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याने, तेथील नागरिकांनी सततच्या त्रासामुळे घरे विक्रीला काढली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाचा निधी शिल्लक आहे काय, असल्यास सदरहू निधी दुसरीकडे वर्ग करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून निघणारा धूर व दुर्गंधीबाबत वेळोवेळी उपाययोजना सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) घनकचरा व्यवस्थापनाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल्या अंमलबजावणीकरीता उपलब्ध निधी शिल्लक असून, सदर निधी इतर कामासाठी वर्ग केलेला नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील काळाचौकी परिसरातील जिजामाता नगर येथे म्हाडातर्फे वसतीगृह बांधण्याबाबत

(४८) ४३७२४ (१८-०४-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळाचौकी परिसरातील जिजामाता नगर येथे म्हाडातर्फे १८ मजली इमारतीमध्ये ३७५ मुलामुलींच्या निवासासाठी वसतीगृह बांधण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी या प्रकल्पासाठी किती खर्च येणार असून इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१५-०६-२०२२) : (१) हे खरे आहे .
(२) व (३) सदर इमारतीच्या बांधकामाकरीता रू .१८.०४ कोटी इतका खर्च येणार आहे.
उक्त इमारतीचे बांधकाम करण्यासाठी म्हाडाकडून ई - निविदा मागविण्यात येऊन दि . ५ . १ . २०२२ रोजी कंत्राटदारास स्वीकृती पत्र देण्यात आलेले आहे .
कंत्राटदारास स्वीकृती पत्र दिल्यानंतर नकाशे मंजूरी व त्यानुषंगिक इतर कामे सुरु असून नकाशे मंजूरीनंतर कंत्राटदारास कार्यादेश देण्यात येतील. कार्यादेश दिल्यापासून अंदाजे २४ महिने बांधकामाचा कालावधी असणार आहे .

चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये होत असलेले प्रदुषण रोखण्याबाबत

(४९) ४३८५४ (१८-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पावर प्रदूषणांचे प्रमाण वाढत असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पावर होत असलेले प्रदूषण रोखण्याबाबत तसेच प्रदुषणास जबाबदार असणा-या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उद्धव ठाकरे (१३-०६-२०२२) : (१) चंद्रपूर जिल्ह्यातील खाण उद्योग व विज निर्मिती प्रकल्पामुळे स्थानिक पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत निरी, नागपूर व भारतीय वन्यजीव संस्थान, देहरादुन यांच्या सहभागाने २ वर्षाच्या कालावधीमध्ये संशोधन प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर संशोधनातुन खाण उद्योग, विज निर्मिती प्रकल्प यांचा व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील हवा, पाणी, प्रकाश, ध्वनी, भुजल व जैविक घटकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात येऊन त्याअनुषंगाने आवश्यक उपाययोजना सुचविण्यात येतील.
(२) व (३) प्रश्न उदभवत नाही.

मौलाना आझाद महामंडळातील पदे रिक्त असल्याबाबत

(५०) ४४०६२ (०९-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासनाने मौलाना आझाद महामंडळाची निर्मिती करतांना १५७ पदे मंजूर केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर पदांपैकी ९० टक्क्याहून अधिक कायमस्वरुपी पदे रिक्त असल्याने महामंडळाचा कारभार सध्या कंत्राटी आणि रोजंदारी कर्मचाऱ्यांमार्फत सुरु आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चार जिल्हयात महामंडळाचे कार्यालय नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने रोजंदारी कर्मचा-यांना शासन सेवेत सामावून घेण्यासह तातडीने अन्य रिक्त पदे भरण्याबाबत व कार्यालय नसलेल्या जिल्हयांत कार्यालये तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. जितेंद्र आव्हाड (१४-०६-२०२२) : (१) होय.

(२) सद्यिस्थतीत महामंडळातील मंजूर पदांवर एकूण ४६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी व्यवस्थापकीय संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. कंपनी सेक्रेटरी हे पद मानधन तत्वावर भरण्यात आलेले आहे. उर्वरित ४४ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली आहेत.

(३) महामंडळामार्फत सर्व जिल्हयांसाठी योजना राबविण्यात येत आहेत. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्हयांसाठी महामंडळाचे मल्होत्रा हाऊस येथे एक कार्यालय कार्यरत असून ठाणे व पालघर जिल्ह्याचे काम ठाणे जिल्हा कार्यालयातून तर गोंदिया व गडचिरोली जिल्ह्याचे कामकाज चंद्रपूर येथील कार्यालयातून हाताळण्यात येते.

(४) महामंडळाच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचे सेवा प्रवेश नियम दि.१२ सप्टेंबर, २०१९ रोजी अंतिम करण्यात आले असून सदर सेवा प्रवेश नियमामध्ये कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याची बाब अंतर्भूत करण्यात आली आहे. त्यानुसार सेवा नियमित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

ज्या जिल्हयांमध्ये महामंडळाची कार्यालये नाहीत त्या जिल्हयांमध्ये कार्यालय सुरु करण्याची बाब महामंडळाच्या विचाराधीन आहे.

(५) महामंडळासाठी मंजूर करण्यात आलेल्या पदांसाठीचे सेवा प्रवेश नियम दि.१२ सप्टेंबर, २०१९ रोजी अंतिम करण्यात आलेले आहेत. सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित केल्यानंतर उर्वरित पदे भरणे अपेक्षित आहे.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.